# प्रसिद्धीपत्रक

सहकार विभागातील गट - क संवर्गातील सरळसेवेची रिक्त पदे भरण्याकरिता दि.०६/०७/२०२३ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीस अनुसरून विहीत मुदतीत अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा टी.सी.एस. या कंपनीमार्फत सोमवार दिनांक १४/०८/२०२३ आणि बुधवार दिनांक १६/०८/२०२३ रोजी घेण्यात आलेली आहे.

ज्या पदांच्या परीक्षा एकापेक्षा जास्त शिफ्ट मध्ये झालेल्या आहेत,अशा पदासाठी परीक्षा दिलेल्या उमेदवारांच्या गुणांचे मीन स्टँडर्ड डेव्हिएशन या सुत्रानुसार सामान्यीकरण (नॉरमलायझेशन) करण्यात आले आहे. त्यानुसार पदनिहाय उमेदवारांचे गुण सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्या https://sahakarayukta.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळा वर प्रसिद्ध करण्यात येत आहेत.

सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

दि.१/११/२०२३